'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 1
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March - 2014

# नाशिक जिल्ह्यातील पैठणी उद्योग : समस्या व भवितव्य

**प्रा. के. आर. उदमले**
विभाग प्रमुख, कॉस्ट ॲण्ड वर्क्स् अकौन्टींग
**म. स. गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प**
**जि.नाशिक ४२३१०५ (महाराष्ट्र)**

***आजही सर्वांची नजर खेचून घेणाऱ्या पैठणीकडे शासनाचे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष नाही. बहुसंख्य कारागीर कर्ज बाजारी असल्याचे दिसून आले. हा विणकर वर्ग असंघटित असल्यामुळे एकत्र येऊन व्यापाऱ्यांशी सौदेबाजी करु शकत नाही. शासनाचा पैठणीसाठी हमी भाव नसल्यामुळे पाहिजेत्या किंमतीत माल व्यापाऱ्यांना विकावा लागतो आणि येथेच त्यांचे व्यापाऱ्यांकडून आर्थिक शोषण केले जाते. भांडवली खर्चाचा विचार करता हा उद्योग भविष्यात हळूहळू लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.***

## १) प्रस्तावना:

नाशिक जिल्ह्यातील येवले येथील हातमाग उद्योगाचा इतिहास रघुजी नाईक या मराठा सरदारापासुन सुरु होतो. १६६७ च्या सुमारास रघुजी नाईक सरदाराने 'येवलेवाडी ' ची स्थापना केली. येवलेवाडीच्या भाग्योदयासाठी व्यापार उदीम वाढावा म्हणून रेशीम कारागीर व विणकर यांना आश्रय दिला. अनेक विणकरांनी येवल्यात पैठणी उद्योग सुरु केला. येवल्याचे भवितव्य विणकर कारागिरांनी घडविले. १८ व्या शतकाच्या प्रारंभापासून येवल्याचे नाव आसपासच्या परिसरात झळकू लागले. येवल्याचे रेशीम श्रीमंताच्या अंगाखांद्यावर झुलू लागले. असेच एक नांव येवले येथील तयार होणाऱ्या रेशीम जरतारी वस्त्राला मिळाले. ते महावस्त्र म्हणजे पैठणी किंवा शालू होय.

## २) अभ्यासाची उद्दिष्टे:

१) पैठणी उद्योगाने व्यापलेले क्षेत्र जाणून घेणे.

२) पैठणी उद्योगातील मालकी कशा प्रकारे आहे हे समजून घेणे.

३) पैठणी उत्पादनाचे प्रकार समजावू घेणे.

४) पैठणी उद्योगातील समस्या जाणून घेणे.

५) पैठणी उद्योगाचे भवितव्य जाणून घेणे.

## ३) संशोधन पद्धती :

१) अभ्यासकाने पैठणी उद्योजक, कामगार, व्यापारी व ग्राहक यांच्या भेटी घेवून माहिती संकलित केलेली आहे.

२) अहवाल, माहिती पुस्तके, इतर संदर्भ पुस्तके यांचा अभ्यासकाने शोध निबंध लिहितांना उपयोग केलेला आहे.

## ४) पैठणी उद्योगाने व्यापलेले क्षेत्र:

नाशिक जिल्ह्यात येवला व मालेगांव या दोन ठिकाणी हातमाग व यंत्रमाग हा व्यवसाय चालतो. त्यादृष्टीने नाशिक जिल्ह्यात या उद्योगाने व्यापलेले क्षेत्र पुढील प्रमाणे..

**नाशिक जिल्हा**

**मालेगांव** | **येवला**

| मालेगांव | येवला |
|---|---|
| १) हातमाग उद्योग ० % | १) हातमाग उद्योग १०० % |
| २) यंत्रमाग उद्योग ९९ % | २) यंत्रमाग उद्योग ०.५ % |

(संदर्भ : पैठणी उद्योजकांच्या मुलाखतीच्या आधारे)

सध्या मालेगांव येथे यंत्रमागावर सफेद सुती कापड (५० %) , पॉलीस्टर कापड (४० %), रंगीत साडी (८ %), लुंगी (१ %), हातरुमाल (०.५ %) उत्पादने घेतली जातात. येवला येथे हातमागावर पैठणी (१ ००%) व यंत्रमागावर उपरणे (०.५ %) उत्पादने घेतली जातात.

**५) पैठणी उद्येगातील कामगार-**

येवल्यात पूर्वी ३००० हातमागावर पैठणीचे उत्पादन घेतले जात होते. तेव्हा येवले पैठणीबाबत महाराष्ट्राचे बनारस होते. आज येवल्यात १००० हातमागावर पैठणीचे उत्पादन घेतले जाते. जवळ-जवळ ६ हजार ते ८ हजार लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. १७ व्या शतकापासून येवल्यामध्ये पैठणीचे उत्पादन केले जात आहे. सध्या साळी, कोष्टी, क्षेत्रिय व मोमीन विणकर समाज येवल्यात पैठणीचे उत्पादन करतांना दिसतात.

RESEARCH JOURNEY

**६) पैठणी उद्योगाची मालकी:**

येवला येथे एकूण १००० हातमागांपैकी खाजगी मालकीचे हातमाग ९० % तर सहकारी मालकीचे हातमाग १०% आहेत. या उद्योगात खाजगी मालकीचे प्रमाण जास्त असल्यामुळे स्वत: मालकच व्यवसायाचे व्यवस्थापन करतात. तसेच स्वत: मालक व्यवस्थापक, कारागीर व मजूर अशी तिहेरी भूमिका पार पाडतांना दिसतो. या उद्योगात स्वमालकी असल्यामुळे नफा एकट्याला मिळतो व तोटाही त्यालाच सहन करावा लागतो.

**७) रेशीम व जर पुरवठा:**

पैठणी उत्पादनासाठी लागणारे रेशीम व जर यांचे उत्पादन पूर्वी पैठण व येवला याच ठिकाणी मोठ्याप्रमाणावर तयार केले जात होते; परंतु अलीकडे पैठण व येवला येथील रेशीम व जर उत्पदन बंद झाल्यामुळे रेशीमच पुरवठा बंगलोर तर जरीचा पुरवठा सुरत बाजारपेठेतून होतो. काही विणकर स्वत: बंगलोरला जाऊन रेशीम खरेदी करतात. साधारणत: या व्यवहारात रेशीम व जर याची सरासरी वार्षिक उलाढाल २.५ कोटी रुपये होत असल्याचे आढळुन आले.

**८) पैठणी उत्पादनपाचे प्रकार:**

सध्या येवला येथे १००० हजार हातमागावर पैठणीचे उत्पादन घेतले जाते. हातमागावरील पैठणी उत्पादनाचे मुख्या दोन प्रकार असून त्यामध्ये आणखी काही प्रकार पडतांना दिसतात.

**१. साधी पैठणी:**

सध्या पैठणीला पारंपरिक पैठणी असे म्हणतात. ही पैठणी नक्षीच्या दृष्टीने आकृती प्रधान असते. विणतांना नक्षीचा तोल ढळत नाही. प्रमाणबद्ध अशा सरळ तिरप्या रेखा कोन आणि वर्तुळे भूमितीय पद्धतीची असतात. त्यामुळे या नक्षींना विलक्षण गतिमानता प्राप्त होत असते. या पैठणीमध्ये 'नारळी ', 'आकृटी' 'रुईफूल', 'बांगडी', 'पंखा', 'कुयरी' इ. नक्षी विणली जाते साध्या पैठणीमध्ये काही पैठण्या सिंगल पदराच्या असतात तर काही डबल पदराच्या असतात. त्यानुसार त्यांच्या किंमती कमी-जास्त असतात.

**२. ब्रोकेड पैठणी:**

ब्रोकेड पैठणीच्या काठाला 'मोरा' ची किंवा 'पोपटा' ची नक्षी विणलेली असते. त्यामुळे एक सूत चुकला तरी पूर्ण नक्षी चुकण्याची शक्यता असते. अर्थात ब्रोकेडची एक पैठणी विणायला ७ ते ८ महिने लागतात व तिच्यात ७२% जर असल्याने किंमती १५ हजारापासून पुढे असतात. डबल ब्रोकेड पैठणी असाही प्रकार आहे. आठ पदरी सूतापासून ही पैठणी तयार होते. त्यामुळे ४५ हजार रुपयांच्या खाली ती मिळत नाही. ब्रोकेड पैठणीचे पुढील दोन प्रकार पडतात.

**३. आसावली:**

आसावली पैठणी प्राचीन काळापासुन आजतागायत पारंपारिक पद्धतीने विणली जाते. आसावली ही कोणत्या फूलाची जात आहे हा प्रश्न पडतो. परंतु विणकरांच्या कल्पनेतील ही आसावली फुलाची वेल मात्र प्राचीन काळापासुन पैठणीच्या काठ पदरावर आजतागायत विणली जात आहे. हजारो वर्षांपूर्वीची परंपरा या नक्षीला व पैठणीला लाभलेली आहे. सातवाहन कालीन नक्षी म्हणून या नक्षीला विणकरी ओळखतात.

**४. मुनिया:**

मुनिया म्हणजे पोपटाची चोच. या चोचीची नक्षी काठावर असलेली ती मुनिया पैठणी होय. ही १० हजारापासून पुढे मिळते. डबल मुनिया म्हणजे पदर दुप्पट असलेली आणि पदरावर १२ ते १० मोर किंवा पोपटाची नक्षी असलेली पैठणी थेट ४० हाजाराच्या पुढे मिळते. पूर्वी पैठण्या खूपच वजनदार असत. आजही जुनी पैठणी पाहिली तर १.५ किलो ते २ किलो वजनाची ९ वार व ११ वार लांब व ५० इंच रुंद पहावयास मिळते. सध्या पैठणीचे वजन ६०० ग्रॅम ते ९०० ग्रॅम असते. ती पैठणी ६ वार लांब असून तिची रुंदी ४५ ते ४८ इंच असते.

**पैठणी उद्योगाच्या समस्या**

**१) पायाभूत सोयी :**

पैठणी उद्योगासाठी पायाभूत सोयींची कमतरता जाणवते. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते, वीज, ड्रेनेज, बाजारपेठ, शिक्षण व प्रशिक्षण, उद्योगाचे स्थान व जागा, भांडवल, औद्योगिक वातावरण, संशोधन इ. घटकांचा अभाव आहे.

त्याप्रमाणे पैठणी हा व्यवसाय घरातील अपुऱ्या जागेत चालत असल्यामुळे जागेचा अभाव, विज पुरवठ्यासाठी प्रोत्साहन मिळत नाही. हा उद्योग औद्योगिक वातावरणापासून अलिप्त असल्याचे जाणवते. या उद्योगाला वरील स्वरुपाच्या पायाभूत सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यमुळे या उद्योगाची प्रगती खुंटलेली आहे.

**२) कार्यस्थिती:**

हातमागावरील पैठणीचे उत्पादन ज्या ठिकाणी चालते तेथे फक्त एका कोपऱ्यात पाण्याचा माठ भरुन ठेवलेला असतो. पाण्याव्यतिरिक्त या उद्योगात कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. विशेषत: कोंदट वातावरण, अपुरे वायुजीवन, मजुरीचे दर कमी, कामाचे तास जास्त, प्रकाश व्यवस्थेची अपुरी सोय इत्यादी घटकांमुळे कार्यस्थळाचे वातावरण कामगारांना पोषक व आनंदी नसल्यामुळे उत्पादनावर परिणाम होत आहे.

**३) वित्त पुरवठा :**

या उद्योगात खाजगी मालकीचा वाटा ९०% असल्यामुळे भांडवल उभारणीसाठी फारशी अडचण येत नाही. खाजगी मालकीमुळे उद्योजकाचे ९०% स्वत:चे भांडवल असते. भांडवल कमी पडल्यास नातेवाईक व मित्रांकडुन घेतले जाते. कर्जाऊ भांडवल घेण्याकडे उद्योजकांचा कल नसतो. साधारणत: एका उद्योजगाकडे ४ ते ५ हातमाग असतात. त्यामुळे कमी भांडवलात हा व्यवसाय घरात सुरु करता येतो. कर्जाच्या भानगडीत कोणीही पडत नाही. बँकांचे नियम जाचक, त्रासदायक व कर्ज देण्याची उदासीनता असल्यामुळे बँकांकडून कर्ज घेण्याकडे पाठ फिरविली जाते. मर्यादित भांडवल, मर्यादित उत्पादन व मर्यादित नफा ही या व्यवसायाचे वैशिष्ट्य समजावे. आजचा दिवस चांगला गेला हा दृष्टीकोन मालकाचा असल्यामुळे या उद्योगास चालना मिळत नसल्याचे दिसून येते.

**४) अपुरे वेतन :**

पैठणी व्यवसाय हा परंपरागत चालत असलेला व्यवसाय आहे. प्रत्येक कारागीर हा स्वत:चे कौशल्य व बुद्धी वापरुन पैठणीची निर्मिती करत असतो. पैठणी विणकामात ६ ते ८ कारागीर वेगवेगळ्या पद्धतीने काम करतात. अशा प्रकारे अनेक कारागीर मिळून एका हातमागाचे संचालन करतात. साधी पैठणी तयार करण्यासाठी सलग ५ ते ६ दिवसांचा कालावधी लागतो. सदर कारागिरांना दररोज १० ते १२ तास काम करावे लागते. सलग १० ते १२ तास काम करुनही अपूरे, तुटपुंजे वेतन मिळते.

**५) पैठणी उत्पादनाला मागणी:**

साधी पैठणीची किंमत २१०० पासून ते १०,००० रुपयांपर्यंत आहे; तर ब्रोकेड पैठणीची किंमत २०,००० पासून ते २ लाखांपर्यंत आहे. साधी पैठणीची वार्षिक सरासरी उलाढाल ४ ते ५ कोटी तर ब्रोकेड पैठणीची वार्षिक सरारी उलाढाल ७० ते ८० लखापर्यंत आहे. आज बाजरात साधी पैठणीला जास्त मागणी असून, ब्रोकेड पैठणीची मागणी कमी होत चाललेली आहे. साधी पैठणीची किंमत कमी असल्यामुळे सर्वसाधारण मध्यम वर्ग मागणी करतो; तर तुलनेने ब्रोकेड पैठणीची मागणी दिवसेंदिवस घटत चालेली आहे. कारण ब्रोकेड पैठणी विकत घेणारा श्रीमंत वर्ग असल्यामुळे मागणीपूर्व

उत्पादन हाती घेतले जाते. ब्रोकेड पैठणला ग्राहक मिळाले नाहीतर भांडवल गुंतून पडते व माल आपल्या अंगावर पडतो. त्यामुळे ग्राहक वर्ग मर्यादित व उत्पादन देखिल मर्यादित आहे.

**६) बाजारपेठ:**

पैठणीचे विक्रेते मुंबई, दिल्ली, नागपूर, कलकत्ता, मद्रास, पुणे व भारतातील इतर मोठ्या शहरात आहेत. पैठणी मुख्यत्वेकरुन महाराष्ट्रातील गर्भ श्रीमंत असलेले ग्राहकच खरेदी करतात. तसेच उच्च वर्गात समाविष्ट असलेले श्रीमंत लोकही पैठणीचे ग्राहक आहेत. सिनेनट्या, उद्योगपती, आमदार, खासदार व अन्य परदेशातील स्थानिक झालेले भारतीय हे पैठणीचे ग्राहक आहेत. याचाच अर्थ गर्भ श्रीमंत, उच्च व मध्यमवर्गीय हेच पैठणीचे ग्राहक आहेत. पैठणीची बाजारपेठ (विक्री ) जास्त करुन ऑक्टोबर ते मे या दरम्यान जास्त असते, कारण हा काळ लग्न- समारंभाचा, उत्सवाचा आणि धार्मिक कार्यक्रमांचा असल्यामुळे विक्री याच कालावधीत जास्त होते. परंतु जून ते सप्टेंबर या चार महिन्यात बाजारपेठेत मंदी असते.

**७) पैठणीची पिछेहाट:**

२० साव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत पैठणीची पारंपारिक शैली आणि दर्जा टिकून होता. राजेशाही जमाना जेव्हा पासून संपला तेव्हापासून येवल्याच्या या महावस्त्राला असलेली मागणी हळूहळू कमी होत गेली. नंतरच्या काळात लोकांच्या आवडी-निवडीनुसार त्यामध्ये थोडासा बदल करावा लागला. अलीकडे हळूहळू लकार्ड यंत्रावर उत्पादन होऊ लागले. त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढला आणि लोकांची दृष्टी स्वस्त वस्त्र खरेदीकडे झुकू लागली. परिणामी पैठणीची जागा बनारशी शालूने घेतली आणि इतर साड्या बाजारपेठेत येऊ लागल्या. अशा प्रकारच्या स्वस्त व भपकेदार साड्यांनी बाजारपेठेत आपले स्थान निर्माण केले. त्यामुळे पैठणीची मागणी कमी होत गेली व तिची पिछेहाट होऊ लागली. म्हणून पैठणी विणकरांना व कारागिरांना या धंद्यातून स्थलांतर करुन इतर धंद्याचा आश्रय घ्यावा लागला.

**पैठणी उद्योगाचे भवितव्य :**

नाशिक जिल्ह्यातील येवला म्हटल्याबरोबर पटकन पैठणी डोळ्यापुढे येते. पैठणीमुळे येवल्याचा नावलौकीक जगभरात पोहोचला आहे. बोटभर विणायाचे अन् पोटभर खायचे, असे पूर्वी पैठणीबाबत बोलले जात होते. राजवस्त्र म्हणून मान्यता मिळालेल्या पैठणीची महिलावर्गात भुरळ पडते.

राजवस्त्र असणाऱ्या येवल्याच्या पैठणीला महागाईचा फटका बसला आहे. पैठणीसाठी वापरल्या जाणाऱ्या रेशमाचे अन् त्यापाठोपाठ रेशीम रंगणीकामाचीही दरवाढ झाल्यामुळे विणकर कारागीर त्रस्त झाले आहेत. हा उद्योग डबघाईला आला असून हातमाग कारागिरांची वर्षानुवर्षे आर्थिक स्थिती खालावत चाललेली आहे. हा उद्योग घराघरातून चालत आल्यामुळे घरातील थोरांपासुन ते बालकांपर्यंत सर्वांनाच हातभार लावावा लागतो. पूर्ण कुटुंबच या व्यवसायात गुंतलेले दिसते; मात्र पैठणी उत्पादकाला आठ ते दहा तास काम करुनही मिळणारा मोबदला फारच कमी असतो. पैठणी विक्रीपासून मिळणाऱ्या मोबदल्यात आपल्या कुटुंबाच्या मूलभूत व जीवनावश्यक गरजा भागवू शकत नाही. त्यामुळे त्यांचे राहणीमान कनिष्ठ दर्जाचे असून ते सध्या आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आलेले दिसतात.

आजही सर्वाची नजर खेचून घेणाऱ्या पैठणीकडे शासनाचे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष नाही. बहुसंख्य कारागीर कर्ज बाजारी असल्याचे दिसून आले. हा विणकर वर्ग असंघटित असल्यामुळे एकत्र येऊन व्यापाऱ्यांशी सौदेबाजी करु शकत नाही. शासनाचा पैठणीसाठी हमी भाव नसल्यामुळे पाहिजेत्या किंमतीत माल व्यापाऱ्यांना विकावा लागतो आणि येथेच त्यांचे व्यापाऱ्यांकडून आर्थिक शोषण केले जाते. तो या पारंपारिक संकटाला तोंड देत असलेला असून असंख्य अडचणींवर मात करुन हा व्यवसाय डबघाईला आला असतांनाही ऊर्जितावस्थेत आणण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे.

विशेष म्हणजे नवीन पिढी या व्यवसायात यायला तयार नाही. त्यामुळे पूर्वी पाच-सहा हजार हातमाग असणाऱ्या येवल्यात आता निम्म्यापेक्षा कमी  हातमाग झाले आहेत. कारण या व्यवसायात भांडवली खर्च खूप मोठ्याप्रमाणावर आहे. भांडवली खर्चाचा विचार करता हा उद्योग भविष्यात हळूहळू लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. जर पैठणी साडी पेहराव लुप्त झाला तर या व्यवसायाचे भवितव्य धोक्यात येईल. विणकर टिकला तर पैठणी टिकणार असल्याने सरकारने पैठणीचे मोठ्या शहरात प्रदर्शन भरवून ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करावा. हातमाग विणकरांना वाजवी दरात कर्जपुरवठा, अनुदान व सवलती, पैठणीला हमी भाव, कारागिरांना सोयी-सवलती  यासारख्या योजना राबवून हा उद्योग ऊर्जितावस्थेत आणावा. याचाच अर्थ हा उद्योग सध्या ऑक्सिजनवर असून सरकारच्या मदतीवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे.

RESEARCH JOURNEY

**संदर्भः-**

१) प्रश्नावली व मुलाखती संकलीत माहितीच्या आधारे
२) सकाळ, लोकमत, गांवकरी, महाराष्ट्र टाईम्स् व लोकसत्ता दैनिक वृत्तपत्रातील वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या माहितीचा आधार.
३) अडत व्यापारी, किरकोळ व्यापारी व ग्राहक यांच्या संपर्कातून मिळालेल्या माहितीच्या आधारे.